**नियमीत दिवाणी मुकदमा क्र १९४/१५ मधील निशाणी ४६ वरील आदेश**
(दिनांक १०.०२.२०१६)

०१. सदरचा अर्ज हा प्रतिवादी क्रमांक ४ ते ६, १२ ते १५ यांनी झालेला विलंब माफीचा अर्ज देवून कैफियत दाखल करण्याबाबत दाखल केला.

०२. प्रतिवादी क्रमांक ४ ते ६, १२ ते १५ यांच्या म्हणण्या प्रमाणे, प्रतिवादी यांनी दिनांक १०.०७.२०१५ रोजी वकीलपत्र दाखल केलेले आहे. काही प्रतिवादी हे स्वत:हून हजर आहेत. यामध्ये वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये आपसात तडजोडीची बोलणी चालू होती. त्यामध्ये वादी व प्रतिवादी यांना यश आले नाही. त्यामुळे कैफियत देणेस ६९ दिवसांचा विलंब झालेला आहे. सदरचा विलंब माफ न झाल्यास प्रतिवादींचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे म्हणून प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्याची विनंती प्रतिवादींनी केली.

०३. या अर्जास उजर घेत वादीने आपले सविस्तर म्हणणे निशाणी क्र. ४६ खाली मांडले. वादीच्या म्हणण्या प्रमाणे प्रतिवादींनी मुदतीत कैफियत दिलेली नाही त्यामुळे कैफियत देण्यास ६९ दिवसांचा विलंब झाला आहे तरी योग्य तो हुकूम व्हावा अशी विनंती केली आहे.

०४. अर्जातील कथने पाहता खालील मुद्दे उपस्थित होतात व त्या प्रत्येक मुदयास आणि निष्कर्षास अनुसरुन उत्तर मी निम्न प्रकारे देत आहे.

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| ०१ | प्रतिवादी क्रमांक ४ ते ६, १२ ते १५ यांनी मागणी केल्या प्रमाणे विलंब माफ करुन कैफियत दाखल करणेस आवश्यक आहे का ? | *..होय.* |
| ०२ | कोणता आदेश ? | *..अंतिम आदेशाप्रमाणे.* |

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>मुद्दे कमांक १ व २:—</u>**

०५. उभयंताच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकल्यानंतर प्रस्तुत प्रकरणात दाखल सर्व कागदपत्रे तसेच उभंयताना मान्य असलेल्या बाबी पाहता ही बाब आढळून येते की, प्रतिवादी कमांक ४ ते ६, १२ ते १५ यांना समन्स प्राप्त झाल्या पासुन ९० दिवसाच्या आत कैफियत दाखल करणे आवश्यक असतांना प्रतिवादी कमांक ४ ते ६, १२ ते १५ यांनी प्रस्तूत अर्ज दिनांक १८.१२.२०१५ रोजी दाखल केला आहे. वादी व प्रतिवादी यांच्यात तडजोडीची बोलणी चालू होती त्यामुळे त्यांना मुदतीत कैफियत देता आली नाही असे कारण नमूद केले आहे. परंतू, प्रस्तुत कैफियत दाखल करणेस झालेल्या विलंबाचे प्रतिवादींनी दिलेले कारण ग्राहय धरण्यासारखे नाही.

०६. दावा गुणावगुणावर चालण्यासाठी आणि प्रतिवादींचे महत्वपुर्ण हक्क सदरच्या दाव्यात समाविष्ट असल्यामुळे प्रतिवादींची कैफियत अभिलेखावर येणे गरजेचे आहे. तसेच प्रत्येक व्यक्तिला त्याचे म्हणणे मांडण्याची पुरेशी संधी दिली पाहिजे असे नैसर्गिक न्यायदानाचे तत्व आहे. सदरचे तत्व हे प्रतिवादींच्या पक्षात आहे. परंतू, प्रतिवादींनी कैफियत वेळेत न दिल्याने सदरच्या दाव्याचे काम लांबणीवर पडले आहे. म्हणून प्रतिवादींना आदेशित करण्यात येते की, वादीस कॉस्ट/खर्च म्हणून रक्कम रु १५०/— दयावे. या सर्व बाबीचा विचार करुन मुद्या कमांक ०१ चे उत्तर होकारार्थी देण्यात येते. मुद्या क २ च्या उत्तरा दाखल वरील चर्चेस अनुषंगून खालील आदेश पारित करण्यात येतो.

## <u>आ दे श</u>

०१. अर्ज निशाणी ४६ मंजूर करण्यात येते.

०२. प्रतिवादी कमांक ४ ते ६, १२ ते १५ यांनी वादीस कॉस्ट रु १५०/— दिल्यानंतर प्रतिवादी कमांक ४ ते ६, १२ ते १५ यांची कैफियत स्विकारण्यात येईल.

०३. वरील आदेशा प्रमाणे हा अर्ज निकाली काढण्यात येतो.

**(श्रीमती आर. आर. संकपाळ)**
दिनांक : १०/०२/२०१६ सह दिवाणी न्यायाधीश,क. स्तर,
सांगोला

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | Kotkunde A.R. |
| (b) | Court | : | Smt. R.R. Sankpal<br>Jt. Civil Judge, J.D.&<br>J.M.F.C.Sangola |
| (c) | Judgement /Order signed by P.O. on | : | 10.02.2016 |
| (d) | Judgement /Order uploaded on | : | 10.02.2016 |